# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र. ७३७८/२०२६

श्री .जयंत शंकरलाल मुथा
शिवाजीनगर, मुपो-पिंपळगाव बसवंत
जिल्हा-नाशिक पीनः-422209

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (रस्ते-3)
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय
मादाम कामा मार्ग मुंबई-400 032

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (रस्ते)
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय
मादाम कामा मार्ग मुंबई-400 032

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०९.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.१०.२०२३ | ०१.१२.२०२३ | १८.११.२०२३ | -- |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०९/१०/२०२३ रोजीच्या **जोडपत्र अ** नुसार नाशिक हद्दीतील प्रमुख जिल्हा मार्ग ५२ एस.टी. डेपो ते निफाड फाटा या रस्त्याच्या रुंदीकरण व कॉंक्रीटीकरण संदर्भात माहिती मागितली असून यात कामाच्या अति निकृष्ट दर्जास जबाबदार असणाऱ्या ठेकेदार व अधिकाऱ्यांची नांवे, विषयानुसार केलेल्या चौकशी अहवालाच्या व दोर्षीवर केलेल्या कार्यवाहीच्या तपशिलाच्या प्रती मागितल्या असता त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक ०१/१२/२०२३ रोजी दिलेल्या प्रतिसादात दिनांक १८/१०/२०२३ रोजी मुद्दा क्रमांक एक ते तीन या संदर्भातील माहिती ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने देण्यात आली असून मुद्दा क्रमांक एक ते सात बाबत माहिती अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ कार्यालय, नाशिक या कार्यालयाशी संबंधित आहे असे कळविले होते. थेट प्राप्त तक्रारीची दखल अधीक्षक अभियंता कार्यालयामार्फत घेतली जात नसल्याने सदर माहिती ही मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक या कार्यालयातून प्राप्त करता येईल असेही कळविले होते व **जोडपत्र अ कलम ६ (३)** अन्वये मुख्य अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांच्याकडे हस्तांतरित देखील करण्यात आले होते. तथापि, अपिलार्थीना प्रत्यक्षात कुठलीच माहिती प्राप्त झाली नसल्याने प्रथम अपील अर्ज व त्यानंतर द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०१/१२/२०२३ रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना हस्तांतरित केलेल्या **जोडपत्र अ** नुसार नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथील प्रमुख जिल्हा मार्ग ५२ एस.टी. डेपो ते निफाड फाटा या रस्त्याच्या अतिनिकृष्ट कामकाजास जबाबदार असणाऱ्या ठेकेदार व अधिकारी यांची नांवे या संदर्भात चौकशी झाली असल्यास त्याचा अहवाल व कारवाई केली असल्यास ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली त्यांची नांवे व कार्यवाहीचा तपशील तसेच या कामाचा दोषदायित्व कालावधी यामध्ये करण्यात आलेली कार्यवाही व झालेली कारवाई याबाबत संपूर्ण तपशील हा अपिलार्थीना तात्काळ कळविण्याचे निर्देश मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक तसेच अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांना देण्यात येत असून झालेल्या कार्यवाहीचा तपशील हा शासनास व त्याची एक प्रत आयोगास देखील पुरविण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

उपरोक्त आदेशाची एक प्रत ही मा.सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मा.सचिव, रस्ते व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना योग्य त्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात यावी.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र. ७३७८ /२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : २१.०९.२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

RAHUL BHALCHANDRA PANDE

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA PANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:Maharashtra State Chief Information Commission Mumbai, o=Maharashtra State Chief Information Commission Mumbai, ou=State Information Commission, 2.5.4.20=211FC8BA99B710538561CE022F16DB877507502E9F09443B2466F775AF4FDB2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1CEAB2634AF0275602A939C8218A713079109F9B806F4EF6C4B02C512873C5C2, cn=RAHUL BHALCHANDRA PANDE
Date: 2026.10.06 17:07:10 +05'30'

प्रत योग्य त्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१) मा.सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२) मा.सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.